ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

ijindex
digital directory of indian journals

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

# अनुक्रमणिका

आंबेडकरवादी मराठी साहित्य नामांतर व नामविस्तार
प्रा.डॉ.मधुकर गणेश मोकाशी 151

आंबेडकरवादी कवितेतील 'नकार'
प्रा.डॉ. बाबुराव बी. खंदारे 153

लोकनाथ यशवंत यांची आंबेडकरवादी कविता (आता होऊन जाऊ द्या)
डॉ. युवराज धबडगे 157

आंबेडकरवादी मराठी कादंबरी
प्रा.डॉ.जी.व्ही.शिंदे 161

दलित साहित्याचे शब्दपरिवर्तन आंबेडकरवादी साहित्य
डॉ. शत्रुघ्न जी जाधव 164

वामनदादा कर्डक यांच्या निवडक आंबेडकरवादी कवितांचा आढावा
डॉ. बाळासाहेब बी. लिहिणार 167

'मिलिंद' मधील आंबेडकरवादी कवी : डॉ. यशवंत मनोहर
डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे 170

न्ब्वदोत्तर आंबेडकरवादी कादंबरी
डॉ. सारीपुत्र तुपेरे 175

आंबेडकरवादी मराठी कादंबरी
डॉ. शिवराज काचे 180

'थांबा ! रामराज्य येतंय ! या नाटकातून व्यक्त झालेली आंबेडकरवादी जाणीव
प्रा. डॉ. संगीता नारायणराव मुंढे पे.नं.33 183

आंबेडकरी जलसा स्वरूप आणि प्रेरणा
प्रा. डॉ. मनोहर सिरसाट 187

आंबेडकरवादी साहित्याचे मराठी साहित्यात योगदान
प्रा. दत्ता रामचंद्र कांबळे 190

अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील आंबेडकरी विचार
प्रा.डॉ.दिलीप रामचंद्रराव जाधव 193

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI

आंबेडकरवादी मराठी कविता : आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा आविष्कार
डॉ. शिवाजी विश्वनाथ डोळसे 196

आंबेडकरवादी कथासंग्रह : अफवा खरी ठरावी म्हणून
डॉ. अर्चना काटकर 200

आंबेडकरवादी साहित्याचे मराठी साहित्यात योगदान
वर्षा विठ्ठलराव तुरुकमाने 204

आंबेडकरी चळवळ आणि रंगभूमी
सोनाली लक्ष्मणराव इंगळे 206

आंबेडकरवादी भटक्या विमुक्तांच्या साहित्यामधील वास्तववाद
डॉ. सरला गोरे/सावकारे 209

आंबेडकरवादी मराठी कविता
प्रा. विनायक गणपतराव काळे 213

आंबेडकरवादी साहित्याचा दलितेत्तर साहित्यावरील प्रभाव
डॉ. लहूकुमार खंडाळे 215

आबेंडकरवादी कवितेची वैचारिक प्रेरणा
प्रा. कवित्रा सिपु वळवी 218

आंबेडकरवादी मराठी कवितेचे बदलते स्वरूप
प्रा.डॉ.संतोष हंकारे 221

आंबेडकरवादी साहित्याचे मराठी साहित्यात योगदान
प्रा.मोहन सौंदर्य 225

आंबेडकरवादी साहित्यसमीक्षेची ऐतिहासिक पार्श्वभूमी
डॉ. मनोज मुनेश्वर 228

आंबेडकरवादी स्वकथनातील प्रादेशिकता : एक दृष्टिक्षेप
प्रकाश गणपती सुरवसे 231

अण्णाभाऊ साठेच्या कथेतील आंबेडकरवाद
प्रा.कांबळे एस.एस. 234

आंबेडकरवादी मराठी साहित्यातून उदयास आलेले साहित्यिक
डॉ.राखी सिद्राम सलगर 237

''अखंड प्रेमाची वात्सल्यमूर्ती : रमाई''
प्रा.डॉ.यशवंत आश्रुबा हाके 240

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

# 'थांबा ! रामराज्य येतंय !'
# या नाटकातून व्यक्त झालेली आंबेडकरवादी जाणीव

प्रा. डॉ. संगीता नारायणराव मुंढे

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार तळागाळातील लोकापर्यंत झाला. ोपाडयातील लोक, वाडयावस्त्यावरील लोक शिक्षण घेवू लागले. शिक्षणामुळे त्यांच्या ठीकाणी वाची जाणीव जागृती झाली. स्वातंत्र्य , समता, बंधूता, न्याय, स्वाभिमान या मानवी मूल्याची ना ओळख होवू लागली. प्रत्यक्ष जीवन व शिक्षण यातील विसंगती त्या पाठीमागची कारणे ात येवू लागली. फुले आंबेडकरांच्या विचारामुळे स्वाभिमान जागृत होऊ न आपल्यावर होणाऱ्या याय अत्याचाराची जाणीव होऊ न त्याविरूदध तीव्र चिड त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यातूनच ल्या विचारांना वाट शब्दाच्या माध्यमातून काही जनानी करून दिली. त्यातूनच मराठी साहित्यामध्ये मीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी असे वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झाले.

दलित साहित्य हा मराठी साहित्यात १९६० च्या नंतर निर्माण झालेला एक प्रमुख प्रवाह नल्या जातो. जे समाजघटक आजपर्यंत दडपल्या गेले होते, ज्यांच्यावर आजपर्यंत अन्याय त्याचार होत आलेला होता, ज्यांना पशुपेक्षाही हीन वागणूक या समाजाने दिली होती. ज्यांना णूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारल्या गेला होता अशा दडपल्या गेलेल्या लोकांचा आवाज णजे 'दलित साहित्य' होय.दलित साहित्याची मुख्य प्रेरणा ही महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आहे. त्यांनी हिंदू धर्माची चिकित्सा करून जातीभेद नष्ट व्हावेत ासाठी प्रयत्न केले. शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लित समाजाला दिला. त्यांच्यामध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवली. त्यातूनच दलित साहित्याची र्मिती झाली. म्हणूनच मोतीराम कटारे म्हणतात,'दलित साहित्यातील अनुभव विश्वाचे विश्लेषण रण्यासाठी दलित जीवनाबरोबरच आंबेडकरी तत्त्वज्ञान ज्ञात असणे आवश्यक आहे.'१

दलित साहित्यालाच आंबेडकरवादी साहित्य, विद्रोही साहित्य, बोदध साहित्य अशा वेगवेगळया ामाभिधानाने ओळखल्या जाते. डॉ. यशवंत मनोहर यांनी पहिल्यादा दलित साहित्यासाठी ांबेडकरवादी साहित्य असा शब्दप्रयोग केला आहे. त्यांच्या मते 'दलित' हा शब्द विशिष्ट जाती, र्गाशी संबधीत वापरल्या जातो. 'आंबेडकरवाद' हे एक पूर्ण तत्त्वज्ञान आहे. ते संपूर्ण मानव मुक्तीच्या ढयाचे तत्त्वज्ञान आहे. तेच खऱ्या अर्थाने दलित साहित्याची प्रेरणा आहे. म्हणून दलित साहित्या ऐवजी आंबेडकरी साहित्य हाच शब्दप्रयोग सर्वार्थाने योग्य आहे.

डॉ. भगवान ठाकूर यांच्या मते,'दलित साहित्याने स्वतःला 'हरिजन' म्हणून घ्यायला नकार दिला हे योग्यच, परंतु आज 'दलित' शब्द दलितेत्तर मंडळी अगदी साहित्यिक समीक्षक सुद्धा ज्या संकुचित अर्थाने घेतात ते पाहता आज दलित शब्द हरिजन शब्दासारखाच आत्मघातक, विवेकाची आणि विकासाची अडवणारा आणि कालबाहय ठरला आहे.'२ म्हणून दलित शब्दाऐवजी

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Dist Hingoli.(MS.)
SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

आंबेडकरी साहित्य' असा शब्दप्रयोग करण्याचा आग्रह अलिकडे वाढू लागला आहे. कारण आंबेडकरवादीच खऱ्या अर्थाने दलित साहित्यिकांच्या साहित्य निर्मिती मागची प्रेरणा आहे. आंबेडकरवादी विचार हा सर्व जातीयवादाच्या पलिकडे जाणारा स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या लोकशाही मूल्याचा आग्रह धरणारा विचार आहे. दलित साहित्यिकांनी आपल्यावर झालेल्या अन्याय, अत्याचाराचे चित्रण साहित्यातून केले पण त्याला पुढे एकसुरीपणा प्राप्त झाला. पुढे काय? हा प्रश्न राहतो. साहित्य हे जीवनाला प्रेरक असले पाहिजे, त्यातून एक मूल्यविचार रूजविला गेला पाहिजे, ते कालसुसंगत असले पाहिजे म्हणून दलित साहित्यानेही एकसुरीपणा सोडून विश्वव्यापक जाणीव, मानवी समुहाचे हीत पाहिले पाहिजे. या विचारातूनच आंबेडकरवादी साहित्याची उभारणी होताना दिसत आहे. डॉ. भगवान ठाकूर यांच्या मते,' जिथे दलित साहित्य संपते तिथे धम्म साहित्य, आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य सुरू होते. मी दलित आहे माझ्याकडे दलित म्हणून पाहा, मला दलित म्हणून स्थान दया. ही मानसिकता आता संपली पाहिजे. फुले आंबेडकरांचा विचार हा समग्र मानवाच्या दास्यमुक्तीचा शाश्वत जाहिरनामा आहे.अमानवी कल्याणाची, लोकशाही जीवन निष्ठांची समग्र परिवर्तनाची सनद आहे.'३ म्हणजे जे जे पिडित आहेत,शोषित आहेत, माणूसकीपासून वंचित आहेत त्या सगळयाना प्रेरणा देण्याचे काम आंबेडकरी साहित्य करते.म्हणून दलित साहित्याऐवजी आंबेडकरी साहित्य असा शब्दप्रयोग करण्याचा आग्रह पुढे येत आहे.यशवंत मनोहरांनी पहिल्यादा दलित साहित्याला आंबेडकरी साहित्य संबोधले त्या पाठीमागे हीच भूमिका होती.

आंबेडकरी साहित्यामध्ये मोठया प्रमाणावर व विविध वाङ्मय प्रकारातून लिखान झाले आहे. मराठी साहित्य आंबेडकरी साहित्याने संपन्न समृदध केले आहे. कथा, कविता, आत्मचरित्र हे वाङ्मय प्रकार प्रामुख्याने आंबेडकरी साहित्यात पाहायला मिळतात. त्या मानाने नाटक हे फार कमी प्रमाणात लिहीले गेले. त्यात महत्वाचे नाटकाकर म्हणजे दत्ता भगत, रामनाथ चव्हाण, प्रेमानंद गज्वी, प्रकाश त्रिभुवन हे होत. खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी नाटकाला सुरूवात झाली ती महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकापासून. आंबेडकरी चळवळीचा परिपाक म्हणजे प्रकाश त्रिभुवन यांचे 'थांबा, रामराज्य येतय!' हे नाटक होते. नामातंरात्या लढयावर आधारित या नाटकाने खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी रंगभूमी गाजवली. अनेक पुरस्कारही या नाटकाला मिळाले.

'थांबा, रामराज्य येतय!' या नाटकाच्या शिर्षकातूनच बरच काही व्यक्त होतं. स्वातंत्र्य मिळूनही दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार कमी झाले नाहीत, तर ते वाढले. आत्तापर्यंत फक्त संवर्णाकडून दलितांवर अन्याय अत्याचार होत होते, पण आत्ता आंबेडकरांच्या प्रेरणेतून दलितांच्या मनात सवर्णाविषयी असंतोष खदखदू लागला आणि त्यातूनच सवर्ण विरूद्ध दलित संघर्ष सुरु होतो. अशाच संघर्षाचं चित्रण या नाटकातून आले आहे. 'थांबा, रामराज्य येतय!' या नाटकाची सुरूवातच दशावतारी खेळापासून झाली आहे. अगदी रामायण, महाभारताच्या काळापासून दलितांवर अन्याय, अत्याचार घडत असला आहे हे पुराणातील संदर्भ देऊन दाखवले आहे. लंकादहनाचा प्रसंग, द्रोपदी स्वयंवर, क्षत्रियांचा संहार करणारा परशुराम, संमुद्रमंथन, बळीराजा अशा पौराणिक प्रसंगाचा डॉ. आजच्या परिस्थिती संदर्भात अत्यंत खुबीने वापर या नाटकात लेखकाने केला आहे.

COLLEGE
Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist. Hingoli (M.S.)

अशोककुमार लिंबाळे या नाटकाबद्दल म्हणतात,' पुराणकाळांचे सर्व परिचित दाखले देत आधुनिक काळाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न हया नाटकात केलेला दिसून येतो. हा प्रयत्न केवळ अभिनव आणि [illegible] टाकणारा आहे. पुराणातील प्रसंगांची समकालीन संदर्भात प्रक्षोभक मांडणी करण्याचा प्रयत्न प्रकाश त्रिभुवन हयांनी केलेला आहे. पुराणातील सोंग जीवंत आहेत आणि दलितांच्या जीवनात कशी धुमाकु ळ घालत आहेत हयाचं प्रत्ययकारी वर्णन हया नाटकात प्रकट झालं आहे. आजही रामायण घडते आहे, आजही महाभारत घडते आहे.'४

'थांबा, रामराज्य येतय!' या नाटकात दोनच प्रमुख पात्र आहेत. रातराव पाटील व आनंद. रामराव पाटील हा संवर्णाचे प्रतिनिधीत्व करणारे पात्र आहे तर आनंद हा दलित समाजाचं प्रतिनिधीत्व करणारा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून प्रेरणा घेऊ न तयार झालेलं पात्र म्हणजे आनंद आहे. एम. ए. पर्यंतचे शिक्षण घेतलेला आनंद नोकरी न करता आपल्या गावातील मुलांना शिकवण्यासाठी गावात शाळा सुरू करतो. रामराव पाटलाला आनंद गावातील मुलांना शिकवून शहानं करतो हे अजिबात आवडत नाही यातूनच दोघात संघर्ष सुरू होतो. पाटील दशावतारी खेळात हनुमानाचं सोंग घेतलेल्या माणसाकरवी दलित वस्ती व शाळा जाळतो. पंचनामा करण्यासाठी गावात पोलिस येतात. पण पुराव्या अभावी कोणालाही पकडल्या जात नाही. पाटलाविरूद्ध कोणीही साक्ष देत नाही. आनंद एकटाच सांगत असतो पण त्याच्यावर कोणीही विश्वास ठेवत नाही. पुराव्या अभावी कोणालाही पकडता येत नाही. स्वातंत्र्य मिळाले तरी दलितांवर झालेले अन्याय, अत्याचार कमी झालेले नाहीत, सर्व यंत्रणा त्यांच्याच हातात असल्यामुळे त्याचं कायदाही काहीही करु शकत नाही हेच लेखकाने या प्रसंगातून दाखवले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना आरक्षणाचा लाभ मिळवून दिला. पण सवर्ण या आरक्षणाचा लाभ दलितांना घेवू देत नाहीत हेच द्रोपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगातून दाखवले आहे. गावातील पोलिसपाटलाचे पद हरिजनासाठी राखीव सुटते. आनंद हा त्या पदासाठी लायक असतो व तयारही असतो पण ज्या पदधतीने महाभारतात द्रोपदी स्वंयवरावेळी कर्णाला तो कुलहीन शुद्र म्हणून लायक असूनही त्याला स्वंयवरावेळी भाग घेऊ दिल्या जात नाही त्याच पद्धतिने आनंदलाही पोलीस पाटील पदाचा अर्ज ऐनवेळी मागे घ्यायला भाग पाडल्या जातं.म्हणजे काळ बदलला तरी व्यवस्था तशीच असल्याचं लेखकानं दाखवलं आहे. याविरूद्ध आनंद आवाज उठवतो. सगळया लोकांना एकत्रीत करतो. तो म्हणतो, बंधूनो बाबासाहेबांची शिकवण टिकवायची असेल, तर सर्वानी एकत्र यायला पाहिजे. शांततेच्या मार्गाने सरकारला आपल्या कर्तव्याची जाणीव करूण दयायला पाहिजे. कायद्याची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीच बाबासाहेबांनी सांगितलेल्या सनदशिर मार्गानं या सत्याग्रहात, या समता मोर्चात सामील [illegible] यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून आणि कार्यातून प्रेरणा घेऊ न चळवळमय झालेल्या समाजाचं चित्रण आलं आहे. यातूनच सवर्ण विरूद्ध दलित हा लढा सुरू होतो. शेवटी पाटलाला नाइलाज म्हणून आनंदला गावचा सरपंच करावं लागतं. आनंद सगळया गावातील लोकांच्या [illegible] असतो त्यामुळे लोकांना सरपंच म्हणून आनंद चागला वाटतो. तो पाटलाने ज्यांच्या ज्यांच्या जमीनी

SHIVAJI COLLEGE • HINGOLI
Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist. Hingoli (MS)

बळजबरीने बळकावल्या असतात त्या सगळयांच्या जमीनी परत करतो. पाटलाला हे सर्व ...नाही, त्याचं अस्तित्वच धोक्यात येतं तेंव्हा पाटील आनंदलाच संपवतो. आनंद या लढयात मृत्यु... पडला तरी हा लढा संपला नाही त्यापासून प्रेरणा घेऊन लढणारे आनेकजन तयार होतील... पोतराजांच्या शेवटच्या संवादातून लेखकाने सूचित केले आहे. पोतराज म्हणतो, 'त्वा त्या देवमाण... वाचिवल न्हायीस. तू खरी माय न्हवसं, तू खोटी हायस. माजी जलमभरची सेवा फुकट गेली... पावायला देवी न्हवस, तू खोटी हाय. आता म्या तूला पुजनार न्हाय! माज्या ल्योकालाबी तुजी... करू देणार न्याय! आनंदच्या म्हणण्यापरमानं त्याला शिकवीन! माज्या ल्योकाला शिकवीन... म्हणजे जीव गेला तरी चालेल पण आता सवर्णीयांचा अन्याय, अत्याचार खपवून घेतल्या जा... नाही अशी भूमिका दलित समाज घेत आहे. या पाठीमागे प्रेरणा आहे ती डॉ. बाबासाहेब ओबेडकर... त्यांनी दिलेली क्रांतीची हाक खंडोपाडयात जावून पोहोचंली आहे याचं दर्शन हे नाटक घडवते...

मोजक्याच घटना, प्रसंगाच्या माध्यमातून अतिशय परिणामकारक री... नव्या जुन्या तंत्राचा वापर क रून पौराणीक संदर्भ देत देत आजच्या सद्य परिस्थितीवर पर... भाष्य करणारे अतिशय परिणामकारक असे हे नाटक आहे. कलात्मक दृष्टयाही अतिशय परि... असे हे नाटक आहे असेच म्हणावे लागते.

**संदर्भ :-**


१) कटारे मोतीराम फुले -आंबेडकरी साहित्यः आकलन आणि आस्वाद, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृ.५३
२) डॉ.ठाकूर भगवान- आंबेडकरी साहित्य :स्थिती आणि स्थित्यंतरे, आंकाक्षा प्रकाशन नागपूर. प्र. आ. २००९ पृ. ८७
३) डॉ.ठाकूर भगवान- आंबेडकरी साहित्य :स्थिती आणि स्थित्यंतरे, आंकाक्षा प्रकाशन नागपूर. प्र. आ. २००९ पृ. ९०
४) डॉ.लिंबाळे शरणकुमार-साहित्याचे निकश बदलावे लागतील, दिलीपराज प्रकाशन, पुणे. द्वि. आ. २००७ पृ. १६४
५) त्रिभुवन प्रकाश - थांबा, रामराज्य येतय!, वाङमयसेवा प्रकाशन, नासिकरोड. चौथी आ. २०१४ पृ. ०९
६) त्रिभुवन प्रकाश-थांबा,रामराज्य येतय!,वाङमयसेवा प्रकाशन,नासिकरोड.चौथी आ.२०१४ पृ. ४८



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

प्रा. डॉ. संगीता नारायणराव ...
शिवाजी ...